आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 12.11.2026 **वार : गुरुवार**

---

1. चालू रब्बी हंगामात, स्फुरद आणि पालाशयुक्त खतांवर अनुदान देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी
2. स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राचे राष्ट्रीय स्तरावर यश; नवी मुंबई देशात प्रथम तर विटा, रत्नागिरी आणि पिंपरी-चिंचवडची उल्लेखनीय कामगिरी
3. जनजातीय गौरव सप्ताहाला सुरुवात, आदिवासी बांधवांना 15 डिसेंबरपर्यंत मालकी हक्काचं प्रॉपर्टी कार्ड देण्याचा राज्य सरकारचा संकल्प आणि
4. राज्यातल्या गुहागर, लाडघर आणि श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ब्लूफ्लॅग पुरस्कार जाहीर.

खत अनुदान

चालू रब्बी हंगामात, स्फुरद आणि पालाशयुक्त खतांच्या पोषक तत्वांवर आधारित, अनुदान देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजूरी दिली. या अनुदानासाठी चालू आर्थिक वर्ष 2026-27 साठी, 62 हजार 370 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री, अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. आंतरराष्ट्रीय बाजारात युरिया, डीएपी आणि सल्फरच्या किमतीत झालेल्या बदलांमुळे हा निर्णय घेतला आहे. नवे दर 31 मार्च 2027 या कालावधीसाठी लागू राहतील. दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि स्टँड-अप इंडिया या दोन्ही योजना 31 मार्च 2031 पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली असून मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म उद्योगांसाठी असलेल्या पत हमी निधीला पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आहे. यासाठी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून यातून 12 लाख 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जांना आधार मिळेल. स्टँड-अप इंडिया योजनेलाही पाच वर्षांची मुदतवाढ मिळाली असल्यानं यातून महिला, अनुसूचित जाती आणि जमातीतील, अडीच लाख नव्या उद्योजकांना 10 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंतचं कर्ज दिलं जाणार आहे. यासाठी 4 हजार 111 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार

नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन इथं, काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार 2025-26 प्रदान करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत देशात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांना या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल. स्वच्छतेचं लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असल्याच, राष्ट्रपतींनी या वेळी सांगितले. स्वच्छता ही केवळ सार्वजनिक ठिकाणे सुंदर ठेवणे नसून ती नागरिकांचे आरोग्य आणि प्रशासकीय उत्तरदायित्व दर्शवते, असं राष्ट्रपती या वेळी बोलताना म्हणाल्या.

या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात, स्वच्छ शहर गटात नवी मुंबईनं 'सुपर स्वच्छ लीग'मध्ये देशातील सर्वात स्वच्छ शहरांचा मान पटकावला असून; पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने राज्यातील प्रथम स्वच्छ शहराचा बहुमान मिळवला आहे. पाचगणीला 20 हजारांपेक्षा कमी लोकसंख्या गटात द्वितीय, तर स्वच्छ किनारी शहर गटात रत्नागिरीला तृतीय पुरस्कार मिळाला आहे. सांगली जिल्ह्यातील विटा शहरान 20 ते 50 हजार लोकसंख्या गटात प्रथम क्रमांक पटकावला असून या पुरस्काराबद्दल बोलताना विटा नगरपालिकेचे मुख्य अधिकारी विक्रमसिंह पाटील म्हणाले.....

स्वच्छतेच्या प्रत्येक घटनाचे सूक्ष्म नियोजन, प्रत्यक्ष अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि नागरिकांचा सहभाग या चतुसूत्रीवरती आधारित कामकाजामुळे विटा शहराने राष्ट्रीय स्तरावरती आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. शहरातील प्रत्येक घरातून दररोज ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्याची व्यवस्था प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे हा विचार घेऊन विटा शहरामधील लोकसहभाग

वाढवण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम गतवर्षी राबवण्यात आलेले होते शाळा महाविद्यालय व्यापारी संघटना, सामाजिक संस्था आणि नागरिकांना सहभागी करून स्वच्छतेची लोकचळवळ विटा शहराने गतवर्षी उभा केलेली होती. जागरूक नागरिकांनी दिलेल्या सहकार्याचा सुद्धा या यशामध्ये अतिशय महत्त्वाचा वाटा आहे.

विमानतळ

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरची आंतरराष्ट्रीय उड्डाणं नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हलवायला राज्य सरकारनं विरोध दर्शवला आहे. दोन्ही विमानतळं स्वतंत्रपणे आणि पूर्ण क्षमतेनं कार्यरत राहावीत, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात मांडली आहे. यापूर्वी मुंबई विमानतळावरून 14 आंतरराष्ट्रीय शहरांची उड्डाणं नवी मुंबईत हलवण्याची योजना विमानतळाचं संचालन करणाऱ्या 'एमआयएएल'ने मांडली होती. मात्र, अशा प्रकारे उड्डाणं स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाला विविध विमान कंपन्यांनी विरोध केला होता.

जनजातीय

स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या 151 व्या जयंतीनिमित्त आजपासून येत्या बुधवारपर्यंत जनजातीय गौरव सप्ताह साजरा केला जात आहे. गडचिरोली इथं रविवारी होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित राहणार असल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. राज्यातल्या सर्व आदिवासी बांधवांना 15 डिसेंबरपर्यंत त्यांच्या जमिनीचं मालकी हक्काचं प्रॉपर्टी कार्ड देण्याचा संकल्प सरकारनं केल्याचंही ते म्हणाले. जनजातीय गौरव सप्ताहाच्या निमित्तानं पुणे आणि चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यभरात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. नाशिक जिल्ह्यात ओझरखेड धरणाजवळ भगवान बिरसा मुंडा यांचं भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक इथं दिली. आदिवासी समाजापर्यंत शासकीय योजना पोहोचवण्यासाठी, हा सप्ताह राबवला जात असून, नागरिकांनी यात सहभागी व्हावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल बारामती इथं केलं.

भाऊबीज

दुष्काळी पार्श्वभूमीवर भाऊबीजेच्या दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल बारामती तालुक्यातील मुर्टी येथील सोनकरवस्तीवर जाऊन शेतकरी कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यांच्या घरात सर्वांसोबत दिवाळीचा फराळ घेत भाऊबीज साजरी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. तर ऊसतोडीच्या कामात राबणाऱ्या कामगारांशी आपुलकीचे नाते जपत राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी काल मुळशी तालुक्यातील कासारसाई-दारुंब्रे येथील संत तुकाराम साखर कारखान्याच्या परिसरातील ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन भाऊबीज साजरी केली. यावेळी त्यांनी कामगारांशी संवाद साधला.

भाऊबीज

भावाबहिणीच्या नात्याला दृढ करणारा दिवाळीच्या सणातला भाऊबीजेचा दिवस काल सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. पुणे महिला पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालयात यानिमित्त भेटवस्तू देण्यात आल्या. स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्यावतीने गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

बालगृह-धाराशिव

धाराशिव जवळील आळणी शिवारातील स्वाधार मतिमंद मुलींच्या बालगृहात जिल्हा दिव्यांग सशक्तिकरण विभाग आणि जिल्हा परिषदेच्यावतीनं दिवाळी आनंदोत्सव नुकताच साजरा करण्यात आला. 122 मुलींच्या नावानं 122 आनंददीप तयार करून प्रत्येक मुलीच्या अस्तित्वाचा, निरागसतेचा आणि आनंदाचा सन्मान यावेळी करण्यात आला.

उत्कृष्ट शाळा-नागपूर

नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातल्या खैरी परसोडा येथील एकलव्य आदर्श निवासी शाळेची देशातील उत्कृष्ट पाच शाळांमध्ये निवड झाली आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आली आहे. आज नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शाळेचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. प्राचार्या रूपा बोरकर यांनी आपल्या भावना आकाशवाणीकडे व्यक्त केल्या त्या म्हणाल्या....

आमची शाळेची निवड ही नेस्ट मार्फत झालेली आहे. नेस्ट म्हणजे आमची नॅशनल एज्युकेशन सोसायटी फॉर ट्रायबल स्टुडंट त्यांनी एक असेसमेंट केलं होतं ज्याचं नाव होतं केपीआय की परफॉर्मन्स इंडिकेटर त्याच्यामध्ये भौतिक सोयीसुविधा अॅकॅडेमिक आउटकम्स शैक्षणिक स्तर मुलांचा त्याच्यानंतर साफसफाई स्वच्छता शाळेची भोजनाची क्वालिटी याच्यावर निर्धारित काही डोमेन्स बनले होते आणि त्याचे सपोर्टिंग डॉक्युमेंट्स सुद्धा त्यांनी आमच्याकडून घेतले होते आणि आमचं प्रेझेंटेशन बघितला होता.

दुष्काळ

इंदापूर तालुक्यातील घोरपडवाडी इथं राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल शेतकरी कुटुंबात दिवाळीचा फराळ केला. दुष्काळाच्या संकटात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांनी धीर सोडू नये, असं आवाहन त्यांनी या वेळी केलं. जून महिन्यापर्यंत पिण्याच्या पाण्याचं नियोजन केलं जात असून, गरज भासल्यास तात्काळ टँकर दिले जातील, पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना केल्या जातील, अशी ग्वाही भरणे यांनी दिली.

ब्लू फ्लॅग पुरस्कार

डेन्मार्क इथल्या फाउंडेशन फॉर एन्व्हायर्मेंटल एज्युकेशन संस्थेमार्फत देण्यात येणारा, आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा ब्लूफ्लॅग पुरस्कार महाराष्ट्रातल्या गुहागर, लाडघर आणि श्रीवर्धन या तीन समुद्रकिनाऱ्यांना जाहीर झाला आहे. किनारपट्टीची स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, पर्यावरण संवर्धन आणि पर्यटकांच्या सुरक्षेचे निकष पूर्ण केल्याबद्दल हा पुरस्कार मिळाला आहे. राज्यातील पर्यटनस्थळांचा विकास करताना शाश्वत पर्यटनावर भर दिला जात असून कोकणातील पर्यटन व्यवसाय आणि स्थानिक रोजगाराला या पुरस्कारामुळे मोठी चालना मिळण्याची अपेक्षा पर्यटन विभागाकडून व्यक्त करण्यात आली.

चित्रपट महोत्सव

मुंबईत 15 ते 18 नोव्हेंबर दरम्यान चित्रपताका मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये 33 मराठी चित्रपट दाखवले जाणार आहेत. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते याचं उद्घाटन होणार आहे. या महोत्सवात घरत गणपती, फुलवंती, झिम्मा 2 सह 30 नवे चित्रपट आणि पिंजरा, उंबरठा यांसारखे जुने अभिजात चित्रपट पाहायला मिळतील.

शस्त्रक्रिया

पुण्यातील कमांड हॉस्पिटल अर्थात लष्करी रुग्णालयामधील डॉक्टरांनी एका नवजात बालकावर गुंतागुंतीची हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करून जन्मतःच हृदयाचा गंभीर आजार असलेल्या बाळाला जीवदान दिलं आहे.

क्रिकेट

ओमानमध्ये सुरू असलेल्या युवकांच्या 19 वर्षांखालील आशिया कप क्रिकेट स्पर्धेत, आज दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारताचा सामना अफगाणिस्तानशी होणार आहे. सकाळी साडेदहा वाजता सुरू होईल.

हवामान

राज्यात पुढील 24 तासांत सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. राज्यात काल सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं 12 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस एवढं नोंदवलं गेलं.

या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.